महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ ऑटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वायडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
तमाम जनतेस दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्‌अ‍ॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ८४ वा | मंगळवार, दि. २१ ऑक्टोबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# विरोधकांचे आक्षेप अन ढिम्म निवडणूक आयोगः

## मतदार याद्यांतील त्रुटी लोकशाहीसाठी घातक!




**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांमधील गंभीर त्रुटींचा मुद्दा सध्या चांगलाच पेटला आहे. महाविकास आघाडी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि इतर विरोधी पक्षांनी मतदार यादीतील अपारदर्शकता, डुप्लिकेट नोंदी, गायब छायाचित्रे आणि एकाच पत्त्यावर असंख्य मतदार नोंदवले जाणे याबाबत जोरदार आक्षेप नोंदवले आहेत. मात्र निवडणूक आयोगाची भूमिका पाहता, या आक्षेपांवर ठोस पावले उचलली जातील की नाही, याबाबतच मोठा संशय निर्माण झाला आहे.

**'फक्त निवडणुका नाहीत, लोकशाहीचा प्रश्न!'**

विरोधकांनी मागील दोन दिवसांत राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे आणि मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांची मंत्रालयात भेट घेऊन मतदार याद्यांबाबत आपली चिंता व्यक्त केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, अशा त्रुटींच्या पार्श्वभूमीवर निवडणुका घेणे म्हणजे लोकशाहीची थट्टा ठरणार आहे. परंतु, आयोगाकडून केवळ "सकारात्मक विचार करू" असे उत्तर देत शिष्टमंडळाची बोळवण** करण्यात आली.

या भेटीनंतर शिष्टमंडळाने आपले सर्व मुद्दे आणि पुरावे केंद्रीय निवडणूक आयोगाकडे पाठवले आहेत. मात्र, दिल्लीकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई वा आश्वासन देण्यात आलेले नाही.

**मतदार यादीतील त्रुटींचे स्वरूप**
**विरोधकांनी लावलेले आक्षेप अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेतः**

- एकाच पत्त्यावर 100 ते 200 मतदार नोंद
- छायाचित्रे गायब असलेले हजारो मतदार
- एकाच मतदार क्रमांकाचा अनेकांना वापर
- विरोधकांचे मतदार हटवले, तर काही ठिकाणी नियोजित घडवून समावेश
- मतदार यादीचे सर्व्हर बाहेरील व्यक्ती हाताळत असल्याचे गंभीर आरोप

राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गटाचे) नेते जयंत पाटील, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, तसेच काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी सुसंगत आकडेवारीसह या त्रुटींचा पर्दाफाश केला आहे.

**इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर निवडणुका**

राज्यात आगामी तीन महिन्यांतः

- २९ महानगरपालिका
- २४६ नगरपरिषदा
- ४२ नगरपंचायती
- ३२ जिल्हा परिषदा
- ३३६ पंचायत समित्या

...या सर्वांचे कार्यकाळ संपल्यामुळे एकाच वेळी निवडणुका होणार आहेत.

या निवडणुकांपूर्वी निवडणूक आयोगाने एक जुलै २०२५ पर्यंत मतदार याद्या अद्ययावत करण्याचे काम पूर्ण केल्याचे सांगितले, मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी याद्यांतील त्रुटी समोर येत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणावर जुनेच निकष लागू ठेवत ३० जानेवारी २०२६ पूर्वी मतदान प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

**'दोषमुक्त याद्यांशिवाय पर्याय नाही लोकशाहीच्या आरोग्यासाठीः**

- मतदार याद्यांतील त्रुटींना मूळापासून दूर करणं
- प्रक्रियेतील पारदर्शकता वाढवणं
- आयोगाची कार्यपद्धती जनतेपुढे खुली ठेवणं
- या साऱ्यांचा अवलंब अत्यावश्यक ठरत आहे.

"निवडणुकीत कोण जिंकलं वा हरलं याचं देणं-घेणं आयोगाचं नसावं, पण प्रक्रिया निःपक्ष आणि निर्दोष असणं हे मात्र आयोगाचं कर्तव्य आहे."

### आयोगाची पारदर्शकतेकडे पाठ?

निवडणूक आयोगाकडे डिजिटल साधनसंपत्ती आणि प्रणाली असूनही, आजही मतदार याद्या दोषमुक्त करण्यात अपयश येत असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. 'मतदार याद्या तयार करताना 'डुप्लिकेट एन्ट्री' वगळणारे सॉफ्टवेअर, बूथ लेव्हल व्हेरिफिकेशन मोहिम, राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या संमिलनातून संयुक्त यादी तपासणी — या सर्व गोष्टींनी निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास वाढवता येईल,' असा सल्ला विरोधकांनी दिला आहे.

### भविष्यातील परिणाम - 'घाम फुटेल' अशी शक्यता!

या साऱ्या प्रकारामुळे लोकशाही प्रक्रियेवर सामान्य जनतेचा विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त होत आहे. निवडणूक आयोगाच्या निष्क्रियतेमुळे जर बोगस मतदारांच्या आधारे सत्तास्थापना होत असेल, तर हा राजकीय घोटाळा ठरू शकतो.

'जर निवडणुकीचा निकाल याद्यांमधील फेरफारांवर आधारित ठरत असेल, तर अशा लोकशाही व्यवस्थेत काम करण्याला अर्थ नाही,' अशी उद्विग्न प्रतिक्रिया महाविकास आघाडीच्या एका वरिष्ठ नेत्याने दिली.

## पिठलं-भाकर खात, शेतकऱ्यांसह काँग्रेसने साजरी केली काळी दिवाळी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** एका बाजूला सत्ताधाऱ्यांच्या बंगल्यांवर दिवाळीचा जल्लोष, फराळाची मांदियाळी आणि उत्सवाचा माहोल सुरू असताना, दुसऱ्या बाजूला अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या घरात मात्र काळोख पसरलेला आहे. अतिवृष्टी, भाजप महायुती सरकारची निष्क्रियता आणि शेतीविरोधी धोरणांमुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या वेदनांना आवाज देण्यासाठी, शेतकऱ्यांना आजपर्यंत मदत न केल्याच्या निषेधार्थ सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शहर काँग्रेस अध्यक्ष नरोटे यांच्या नेतृत्वाखाली जुना जिल्हाधिकारी कार्यालय (पूनम गेट) येथे हे आंदोलन पार पडले.



या वेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी आणि अतिवृष्टीग्रस्त मदतीपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन पिठलं-भाकर आणि ठेचा खाऊन प्रतीकात्मक काळी दिवाळी साजरी केली.


यावेळी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष नरोटे म्हणाले, 'शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून, भाजप-महायुती सरकारने केवळ घोषणा करून शेतकऱ्यांची थट्टा केली आहे. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा होईल, असे सांगण्यात आले होते, परंतु आजतागायत एकाही शेतकऱ्याच्या खात्यात एक रुपयाही जमा झालेला नाही. घोषणांच्या गजरात सरकारने संवेदनशीलतेचा विसरच पडला आहे.'

'शेतकऱ्यांना मदत देता येत नाही म्हणून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी राज्यात जातीय आणि धार्मिक दंगली भडकविण्याचा प्रयत्न केला जातोय. डोळ्यावर झापडे आणि सत्तेच्या धुंदीत असलेले हे सरकार शेतकऱ्यांच्या वास्तव समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.'

'मुख्यमंत्र्यांनी ३१ हजार कोटींच्या मदतीची घोषणा केली, पण ती मदत कुठे गेली हे जनतेला अजूनही माहिती नाही. घोषणा मोफत असतात, पण मदतीसाठी इच्छाशक्ती लागते — ती या सरकारकडे नाही. पूरग्रस्त शेतकऱ्यांना एक रुपयाही मिळालेला नाही. उलट ऊस शेतकऱ्यांना टनामागे १५ रुपये मागणारा मुख्यमंत्री म्हणून फडणवीसांची ओळख झाली आहे.'

(पान 2 वर..)



## संपादकीय

# आशेचा दीपोत्सव

भारतीय संस्कृतीतील सर्वात लोकप्रिय आणि मंगलमय सण असे ज्याचे वर्णन केले जाते त्या दीपोत्सवाला प्रारंभ झाला असून सर्वत्र आशेचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि वाणिज्यमंत्री पियुष गोयल यांनी दिवाळीच्या पूर्वसंध्येला संयुक्त पत्रकार परिषद घेऊन भारतीय बाजारपेठेवर लक्ष्मी प्रसन्न झाल्याचा दावा केला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये अर्थव्यवस्थेला प्रचंड मोठी भरारी मिळाली असून सर्वत्र आशादायक परिस्थिती आहे, असा दावा दोन्ही मंत्र्यांनी केला आहे. दीपोत्सवाच्या पूर्वी संपन्न झालेल्या नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जीएसटी मध्ये सुधारणांची घोषणा केली होती. त्यामध्ये झालेल्या कर कपातीचा लाभ आता सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला असल्याने गेल्या काही दिवसांमध्ये बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर खरेदी झाली आहे आणि अर्थव्यवस्थेला तेवढ्याच मोठ्या प्रमाणात पाठबळ लाभले आहे असा सरकारचा दावा आहे.

हा दावा करताना मंत्र्यांनी जे आकडे दिले आहेत त्यावरून जीएसटी कपातीचा लाभ सर्वसामान्यांना आणि अंतिमतः अर्थव्यवस्थेला झाला आणि एकूणच आशादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. करकपातीमुळे सर्वसामान्यांच्या हाती पैसे आल्यामुळे दुचाकी, तिचाकी प्रवासी वाहने आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. देशात कधी नाही इतकी चारचाकी वाहनांचीसुद्धा विक्री झाली आहे. जागतिक पातळीवर एकूणच अस्थिर परिस्थिती असतानासुद्धा भारताच्या विकासाची गती मजबूत झाल्यामुळेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला भारतीय विकास दराचा अंदाज 6.6% पर्यंत सुधारित जाहीर करावा लागला आहे, असा दावाही सरकारतर्फे करण्यात आला आहे. गेल्याच आठवड्यात नाणेनिधीने भारतीय आर्थिक विकासाचा नवीन दर जाहीर केला आहे.

एकूणच सर्वसामान्यपणे भारतीय अर्थव्यवस्थेला नेहमीच सणांच्या आणि उत्सवांच्या पार्श्वभूमीवर एक उभारी मिळत असते. दीपोत्सवाच्या कालावधीमध्ये बोनस आणि इतर मार्गांनी सर्वसामान्य नागरिकांच्या खिशात नेहमीपेक्षा जास्त पैसे येत असल्याने खरेदीचा उत्साह जास्त असतो. सामान्य नागरिकही वर्षभर काटकसर करून दीपावली सण साजरा करण्यासाठी पैसे राखून ठेवत असतो.

गणेशोत्सव, शारदोत्सव आणि दीपोत्सव या तीन महत्त्वाच्या सणांच्या कालावधीमध्ये भारतीय बाजारपेठेमध्ये मोठ्या प्रमाणावर उलाढाल नेहमीच पाहायला मिळते. अर्थात एकीकडे अशा प्रकारे खरेदीचे प्रमाण वाढले असले तरी दीपोत्सवामध्ये सर्वसाधारणपणे सोन्याची खरेदी करण्याचे जे प्रमाण असते त्याला मात्र सोन्याच्या दरामुळे चाप बसण्याची शक्यता आहे.

केवळ सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये सोन्याचा दर दुप्पट झाला असल्याने आणि तेवढ्या प्रमाणात सर्वसामान्य नागरिकांच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली नसल्याने उत्सवाच्या कालावधीमध्ये किंवा लग्नाच्या हंगामामध्ये सोने खरेदी करताना अनेकदा विचार केला जाऊ शकतो. अर्थात सोन्यासारख्या धातूची किंमत जेवढी वाढते तेवढी त्याच्या खरेदीचा स्टेटसही वाढत असल्यामुळे स्टेटससाठी खरेदी करणारे किंवा गुंतवणुकीचा लाभ म्हणून खरेदी करणारे यांच्या माध्यमातून सोन्याच्या बाजारपेठेमध्ये सुद्धा सकारात्मक उलाढाल होऊ शकते. एकीकडे अशा प्रकारचे आशादायक चित्र निर्माण होत असतानाच दुसरीकडे देशाच्या विविध भागांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना जो मोठा फटका बसला आहे त्याचाही काही विचार करावा लागणार आहे. सरकारी पातळीवर विविध योजनांची घोषणा करून आणि आर्थिक मदत जाहीर करून शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न झाला असला, तरी वर्षभर कष्ट करूनही शेतीच्या माध्यमातून हाती काहीच लागले नाही ही बळीराजाच्या मनातील निराशेची भावना मात्र कायम आहे. भारतीय अर्थव्यवस्था अजूनही कृषिप्रधान असल्यामुळे या हंगामामध्ये पावसाने शेतीचे जे नुकसान केले त्याचे परिणाम नजीकच्या कालावधीमध्ये दिसू शकतात. आता ग्राहकोपयोगी वस्तूंच्या खरेदी विक्रीमुळे अर्थव्यवस्थेला उभारी मिळाली असली तरी अन्नधान्यांच्या बाबतीमध्ये मात्र नजीकच्या कालावधीमध्ये टंचाई आणि महागाई हे दोन विषय गंभीरपणे समोर येऊ शकतात. सरकारलाही त्याची जाणीव असेल आणि याबाबतही सरकारने काही उपाययोजना केली असेल अशी आशा करायला हरकत नाही.

सरकारची खरी कसोटी उत्सवाचा हा हंगाम संपल्यावरच असणार आहे. अर्थव्यवस्थेला जी झळाळी मिळाली आहे ती कायम ठेवण्यासाठी नंतरही काही उपाययोजना करण्याचे नियोजन सरकारला करावे लागेल. अर्थव्यवस्थेचा वाढीचा हा वेग कायम राखला आणि त्यामध्ये भविष्य काळामध्ये अधिक सुधारणा झाली तर ती खऱ्या अर्थाने आशादायक गोष्ट मानता येईल. अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्र असलेले कृषी क्षेत्र, दुय्यम क्षेत्र असलेले औद्योगिक क्षेत्र आणि तृतीय क्षेत्र असलेले सेवा क्षेत्र या सर्वांचा एकत्रित आणि योग्य विकास झाला तरच खऱ्या अर्थाने अर्थव्यवस्था उजळली असे म्हणतात येईल.

# मानवतेचा दीप लावू!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा राजा असो की झोपडीत राहणारा गोरगरीब प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान मुलेच नाही तर भावा – बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण – भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवाळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. मागील दोन वर्षापासून दिवाळीवरील कोरोनाचे सावट नाहीसे झाले मात्र कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली. मागील दोन वर्षापासून दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी केली. महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा आणि प्रसन्नतेचा उत्सव असल्याने हा उत्साह यावर्षीही असाच कायम राहील असे वाटत होते मात्र ऐन दिवाळीच्या आधी झालेल्या अतिवृष्टीने या उत्साहावर पाणी पडले. राज्यातील शेतकऱ्यांवर आसमानी संकट आले. राज्यातील विविध भागात झालेल्या अतिवृष्टीने उभी पिके आडवी झाली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला. या संकटातून सावरण्याची ताकद शेतकऱ्यांना मिळो आणि त्यांची दिवाळी गोड व्हावी अशी प्रार्थना राज्यातील 13 कोटी जनता देवाजवळ करत आहे.

**दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!**

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.

गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीन दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू. मानवतेचा दिप लावू!



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## प्रबोधन

# उद्योगाच्या घरी

कुबेर तुझा भांडारी । आम्हा फिरविशी दारोदारी। यात पुरुषार्थ मुरारी । काय तुजला पै आला? व्यंकटेशस्तोत्र म्हणणारे असा दोष रोज स्नानानंतर ईश्वराला देत असतात. कुबेर हा म्हणे देवांचा खजिनदार. लक्ष्मी ही म्हणे धनाची देवी. ती रोज तळहातातून खणखणीत नाणी देवांच्या खजिन्यात टाकत असते. पण स्वर्गात देवांना सर्व काही फुकटच मिळत असल्याने कुबेराचा खजिना रिकामा कधी होतच नसावा. बरं स्वर्गात घातपात, अपघात, आग किंवा पूर इत्यादी संकटं नसल्याने भरपाई देण्याचा प्रश्न नाही. त्यामुळे या पैशांचं काय करायचं, असं कुबेराला वाटत असेल. लक्ष्मी, कुबेर हे सारे मुक्काम पोस्ट स्वर्ग असल्याने त्यांचे बँकिंग व्यवहार स्वर्गापुरते लिमिटेड असतात.

तरीही धनलोभी माणसांनी पुराण- पोथ्यांतून लक्ष्मीचा शोध घेऊन तिची मंदिरं अनेक ठिकाणी बांधली आहेत. आपणाला लक्ष्मीच्या बँचेस मिळतील आणि आपण मालामाल होऊ असं त्यांना वाटलं असावं. पण मंदिरं बांधण्यात आणि लक्ष्मीपूजेत काही लोक गुंतलेले पाहून बाकीच्यांनी त्यांचा जमीनजुमला, सोनंनाणं पळवलं आणि ते स्वतःला लक्ष्मीपुत्र म्हणवू लागले. लक्ष्मीचे पुजारी मात्र भिक्षुक – भिकारीच राहिले. लक्ष्मीचा पती व्यंकटेश. काहींनी त्याच्याकडून तिच्याकडे स्तोत्र रोज म्हणून काही जमतं का ते पाहिलं. पण काही उपयोग झाला नाही. थोडक्यात, लक्ष्मीने जगाला एकही बँच दिली नाही, ती नाहीच. स्वगर्व धन स्वर्गात आणि जगाचं दारिद्य जगात राहिलं.

बऱ्याच वर्षापूर्वी टाकाच्या फेकी नावाचं पुस्तक चित्र आणि कल्पनाकार शंकरराव किर्लोस्कर आणि भाष्यकार ना. सी. फडके यांनी तयार केलं होतं. त्यात उद्योगी माणसाला लक्ष्मी माळ घालते असं एक चित्र व बोध होता. शंकरराव किर्लोस्कर हे पुरोगामी विचारवंत होते. लक्ष्मीची पूजा मंदिरात जाऊन करायची नसते, तर जे क्षेत्र आपण निवडलं, तेथे श्रम करूनच तिला प्रसन्न करावं लागतं, असा त्यांचा उपदेश होता. पण किर्लोस्कर हे बुवा-महाराज – अवतारी – सद्गुरू नसल्याने त्यांचं मार्गदर्शन वाचणाऱ्यांनीही आचरणात आणलं नाही. परिणामी, आज श्रमाची पूजा सोडून लक्ष्मीचे दरिद्री उपासकांची मोठ्ठी पैदास तयार झाली. ह्या वांझोट्या भक्तीला पश्चात्तापाचं फळच येणार.

पूर्वीची एक फारच सुंदर उपदेशपर कविता आठवते.
दारिद्य मरण यातून मरण बरे, बा दरिद्रता खोटी।
मरणात दुःख थोडे, दारिद्यात व्यथा असे मोठी॥
अशा त्या ओळी होत्या. मृत्यू बरा, दारिद्य नको हे बऱ्याचजणांना पटतं, तरीही सद्गुरू-आध्यात्मिकांचे उपदेश ऐकून आपले कामधंदे सोडून सत्यनारायण, गुरुवारचे लक्ष्मीव्रत, सोळा सोमवार, नवरात्र बसणे, महालक्ष्मी किंवा बालाजीचे अभिषेक, संकष्ट्या अशा मार्गानें अचानक धनलाभाची भाविकबुद्धीने प्रतीक्षा करणारे मोठ्या प्रमाणात दिसतात. लक्ष्मीची पूजा न करणारे गडगंज श्रीमंत जगभर प्रवास करीत चैन करताहेत. त्यांची संपत्ती त्यांच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या परिश्रमातून आणि वाचकांची पसंती उद्योगातून वाढत चालली आहे. त्याची ही पावती इकडे भट-ज्योतिषी व बुवा-सद्गुरूंच्या नादाला लागलेले मात्र देव-देवी दर्शनासाठी उन्हातान्हात रखडत; गाठीला असलेले चार पैसे गब्बर पुजाऱ्याची धन करीत आहेत. ह्या जुगारी मनोवृत्तीतून आपले बहुसंख्य लोक कधीच सुटणार नाहीत, अशीच चिन्हं दिसतात. एकूण देशस्थिती उदासीन आहे ती त्यामुळेच. संत तुकडोजी लिहितात-
श्रीमंता आपुले न वाटे काम।
गरिबा उत्पादनाचे नाही प्रेम।
शिक्षिता हीन वाटती परिश्रम ।
यानेच आली अवकळा ।।
म्हणूनच भजन-पूजनात गुंतू नका. उद्योगी व्हा! कारण-

थोडे धनवंत। बाकीचे कंगाल
जगाचे हे हाल। पूवार्पार ॥ १
शहाणे, चलाख । धूर्त होती धनी
बिचारे अडाणी । कंगाल ते ॥ २
कृपा कुबेराची । अथवा लक्ष्मीची
गोष्ट थापाड्यांची । मूर्खासाठी ॥ ३
शारीरिक श्रम । खूप केल्यावर
पैसा थोडाफार । प्राप्त होतो ॥४
बुद्धीने मिळती । पैसे थोडे जास्त
जगावया फक्त । मिळे त्याने ॥५
कष्टाची गरज । श्रीमंता नसते
आयते मिळते । व्याज त्यांना ॥६
देव, दैव, कृपा। सारे काही झूठ
श्रीमंतांचा थाट । बारामास ॥७
गरिबाने केली । भक्ती किती जरी
मिळेना भाकरी । अर्धी त्यास ॥८
द्रव्य प्राप्त करा। कष्टाने, बुद्धीने
लक्ष्मीच्या भक्तीने । लाभ नाही ।। ९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# शेतकऱ्यांनी आत्महत्या न करता हक्कासाठी लढा द्या – बच्चू कडू यांचा संतप्त सल्ला

**बुलढाणा (कटूसत्य वृत्त):-** 'शेतकरी आत्महत्या करण्याऐवजी हक्कांसाठी लढा दिला पाहिजे,' असा संतप्त सल्ला प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आणि माजी आमदार बच्चू कडू यांनी दिला. बुलढाणा जिल्ह्यातील पातुर्डा येथे पार पडलेल्या राज्यव्यापी शेतकरी हक्क परिषदेत त्यांनी सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली आणि शेतकऱ्यांच्या व्यथा परखडपणे मांडल्या.

परिषदेला राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर, ऑल इंडिया पॅन्थर सेनेचे दीपक केदार यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. कडू म्हणाले, 'शेतकऱ्यांना विचारलं तर ते म्हणतात, 'मला काहीच येत नाही'. पण मग आत्महत्या का करता? अन्यायाविरुद्ध उभं राहा.'



ही परिषद दुःखद आणि वेदनादायक असल्याचे सांगताना कडू म्हणाले, 'दिवाळीच्या दिवशी सुद्धा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करावी लागते, हे दुर्दैव आहे. विचारांची लढाई सोडून तुम्ही जातीपातीच्या राजकारणात अडकता, म्हणूनच शेतकरी मागे पडतो.'

सरकारने शेतकऱ्यांना विविध राजकीय रंगांमध्ये विभागल्यामुळे एकजूट हरवल्याचा आरोप करताना कडू म्हणाले, 'जर सर्व शेतकरी एकत्र आले, तर एका दिवसात सरकार बदलून जाईल. पण दुर्दैवाने आपल्याला एकत्र करता येत नाही.'

**शहरातील आमदार परवडतो, पण शेतकऱ्यांचा आमदार परवडत नाही :** ग्रामीण भागातील प्रतिनिधित्वाच्या अभावावर टीका करताना कडू म्हणाले, 'शहरातील आमदार परवडतात, पण शेतकऱ्यांचा आमदार सरकारला परवडत नाही. तुमच्यापेक्षा तुमचा बैल बरा, त्याला लाथ तरी मारता येते. पण शेतकरी मात्र स्वतःचं अस्तित्व विसरत चालला आहे.'

**मालाला भाव मिळालाच पाहिजे :** 'मालाला योग्य भाव मिळाल्यास शेतकरी नोकऱ्या निर्माण करू शकतो. आरक्षणामुळे काही समाज सुखी होतील, पण योग्य भाव मिळाल्यास संपूर्ण गाव सुखी होईल,' असं सांगत कडूंनी शेतमालाच्या किमतीचा प्रश्न ऐरणीवर आणला.

**'माध्यमे देखील भाजपच्या प्रभावाखाली' :** माध्यमांवरही टीका करताना कडू म्हणाले, 'मोदींनी अमेरिकेतून कापसाच्या गाठी मागवल्या, तरी मीडियात बातमी नाही, कारण अर्धा मीडिया भाजपच्या मालकीचा आहे. जोपर्यंत मातीची किंमत होत नाही, तोपर्यंत समाज सुधारणार नाही.'

**'१३ महिन्यांचं आंदोलन करता आलं, तर सरकारही माघार घेते':** पंजाबच्या शेतकऱ्यांनी काळे कायदे मागे घ्यायला लावले, याच उदाहरणाने प्रेरणा देत कडू म्हणाले, 'आपण मात्र बायकोची आठवण आली की घरी जातो. शेतात जितकी मेहनत करता, त्याच्या एक टक्का मेहनत आंदोलनात केलीत, तर परिस्थिती बदलू शकते.'

परिषदेच्या शेवटी बच्चू कडू यांनी सर्व शेतकऱ्यांना आवाहन केलं की, 'सर्व रंगांचे झेंडे घेऊन शेतकरी एकत्र आले, तर सुखाचे दिवस फार दूर नाहीत. आत्महत्या हा मार्ग नाही. लढल्याशिवाय परिवर्तन शक्य नाही.'

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
NGO DARPAN
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

पान १ वरून

## पिठलं-भाकर खात...

'मंत्र्यांच्या बंगल्यांत नोटांच्या बॅगा सापडत आहेत, हजारो कोटींचे जमीनघोटाळे उघड होत आहेत. एकीकडे शेतकरी बिकट परिस्थितीत आहेत आणि दुसरीकडे महायुती सरकार भ्रष्टाचाराच्या मेजवानीत रमलेले आहे. लबाडाच अवतान जेवल्याशिवाय खरं ठरत नाही — तसेच हे सरकार फक्त आश्वासनांचीच दिवाळी साजरी करत आहे.'

खासदार प्रणिती शिंदे यांना लक्ष्य करणाऱ्या सत्ताधाऱ्यांवरही नरोटे यांनी टीका केली. 'शेतकरी संकटात असताना, त्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या वेदना जाणणाऱ्या प्रणिती ताईंना ट्रोल करणं हे निंदनीय आहे. धरणातून अनियंत्रित पाणी सोडल्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली, हे त्यांनी वस्तुनिष्ठपणे मांडले. पण चूक मान्य करण्याऐवजी शासनाने ट्रोलरांच्या फौजा सोडल्या. सत्य बोलणाऱ्यांवर टीका करणं म्हणजे जनतेच्या वेदनांचा अपमान आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

शेवटी नरोटे म्हणाले, 'अदानी-अंबानींसारख्या उद्योगपतींची लाखो कोटींची कर्जे माफ करणारे मोदी आणि फडणवीस सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफी का करू शकत नाहीत? सरकारने तातडीने भरीव आर्थिक मदत द्यावी. अन्यथा शेतकऱ्यांचा आक्रोश सत्ताधाऱ्यांना झेलावा लागेल.'

'सत्ताधाऱ्यांसाठी दिवाळीचा उत्सव आणि शेतकऱ्यांसाठी काळा अंधार — हा विरोधाभास महाराष्ट्रातील शेतकरीविरोधी राजकारणाचं जिवंत चित्र आहे,' असे नरोटे यांनी सांगत सरकारला संवेदनशील होऊन शेतकऱ्यांच्या बाजूने ठोस निर्णय घेण्याचं आवाहन केले.

यावेळी मा. नगरसेवक प्रवीण दादा निकाळजे, विनोद भोसले, प्रदेश सचिव श्रीशैल रणधिरे, कार्याध्यक्ष हनुमंत सायबोलु, दक्षिण तालुका अध्यक्ष भीमाशंकर जमादार, उत्तर तालुका अध्यक्ष भारत जाधव, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तूपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, अल्पसंख्याक अध्यक्ष जुबेर कुरेशी, ब्लॉक अध्यक्ष देविदास गायकवाड, तिरुपती परकीपंडला, अब्दुल खलीक मुल्ला, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, प्रवक्ता सेल अध्यक्ष नागनाथ कदम, रोजगार स्वयंरोजगार सेल अध्यक्ष राजेंद्र शिरकुल, अल्पसंख्यांक युवक अध्यक्ष मोहसीन मैंदर्गीकर, उद्योग व वाणिज्य सेल अध्यक्ष पशुपती माशाळ, ग्राहक संरक्षण सेल अध्यक्ष वैभव पाटील, कामगार सेल अध्यक्ष सायमन गड्डू, माजी नगरसेवक दत्तू अण्णा बंदपट्टे, प्रा. भोजराज पवार, एन के क्षीरसागर, हारुण शेख, उपाध्यक्ष अंबादास गुत्तीकोंडा, बसवराज म्हेत्रे, ॲड केशव इंगळे, रामसिंग आंबेवाले, अशोक कलशेट्टी, जिल्हा उपाध्यक्ष ॲड संजय गायकवाड राधाकृष्ण विखे पाटील, शकील शेख गिरीधर थोरात, लखन गायकवाड, सैफन शेख, अनिल जाधव, संजय गायकवाड, कुणाल गायकवाड, इलियास शेख, सुनील सारंगी, सुभाष वाघमारे, नूरअहमद नालवार, परशुराम सतारेवाले, सुशीलकुमार म्हेत्रे, तौसिफ शेख, सिद्राम सलवदे, माजी महिला अध्यक्ष ॲड करीमुन्नीसा बागवान, सुमन जाधव, शोभा बोबे, शुभांगी लिंगराज, शशिकांत शिंदे, भीमराव शिंदे, मोहसीन फुलारी, सलीम मणुरे, मोहसीन फुलारी, ज्योती गायकवाड, मुमताज तांबोळी, चंदा काळे, रुकीयाबानु बिराजदार, सुनिता बेरा, निशा मरोड, रोहिणी गायकवाड, सचिन पवार, महेंद्र शिंदे, व्यंकटेश बोमेन, श्रीशैल रणखांबे, अस्लम शेख, रावसाहेब व्हनमाने, महमद शेख, जीवनकुमार वाघमारे, गेनसिद्ध मोटे, रविकिरण मेहता, युवराज कापसे, आनंद मोरे, किसन साखरे, नरेश कोकुल, दाजी गोफने, अर्जुन कादे, शंकर मोरे, दौलत शिंदे, किसन साखरे, योगीराज साखरे, दादाराव पाटील, जयवंत कोळी, बाबुराव खलीपे, विकास कोकडे, पवन सग्गम, नागनाथ शावणे, सचिन सुरवसे, अभिलाष अच्युगटला, धैर्यशील बाबरे, मुमताज शेख, विजयलक्ष्मी झाकणे, गौरी हादीमनी, अनिता भालेराव, मीना गायकवाड, यांच्यासह शेतकरी बांधव, शहर काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# नाल्याचे काम नियोजित पद्धतीने पूर्ण करावे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सहा कमान परिसरात ब्रिजच्या खालून जाणाऱ्या नाल्याचे खोदकाम सुरू आहे. या ठिकाणी नाल्याचा प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी नाल्याचे काम दर्जेदार व नियोजित पद्धतीने पूर्ण करावेत. या कामाचा वेग वाढविण्यात यावा. नागरिकांना पावसाळ्यात अडचण निर्माण होऊ नये यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आदेश आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले. महापालिकेच्या वतीने सहा कमान परिसरात सुरू असलेल्या नाल्याच्या कामाची आज ओम्बासे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी उपायुक्त आशिष लोकरे, नगर अभियंता सारिका आकुलवार, विभागीय अधिक महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन जावेद पानगल तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सहा कमान परिसरात ब्रिजच्या खालून जाणाऱ्या नाल्याचे खोदकाम सुरू असून, या ठिकाणी नाल्याचा प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी आणि परिसरातील पाणी निचरा व्यवस्थित व्हावा. यासाठी आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमध्ये सोलापूर शहरातील नाला परिसरातील विविध नगरातील घरांमध्ये पाणी शरीराच्या घटना घडल्या होत्या. विविध नगरांना पाण्याचा वेढा लागला होता. यामुळे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी शहरातील नाला खोलीकरण, गाळ काढणे आदी कामे युद्ध पातळीवर हाती घेतली आहेत. नाल्याचे प्रवाह सुरळीत करण्याचे कामही मनपाच्यावतीने वेगात सुरू आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# 'आपलं टॅलेंट आपल्या शहरासाठी!' सोलापूरात आयटी प्रोफेशनल्सचा दिवाळी मेळावा उत्साहात संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दिवाळीच्या निमित्ताने सोलापूरमध्ये एक ऐतिहासिक आणि प्रेरणादायी पाऊल उचलण्यात आलं. सोलापूर आयटी असोसिएशनच्या वतीने आयोजित ह्लटेक ब्रू कॉन्फरन्सह्व या आयटी प्रोफेशनल्सच्या मेळाव्याला भरघोस प्रतिसाद मिळाला. पुणे, बेंगळुरू, हैद्राबाद, मुंबई, गुरुग्राम, अहमदाबाद अशा देशभरातील आयटी क्षेत्रात कार्यरत सोलापूरकरांची २०० हून अधिक संख्या या उपक्रमात एकत्र आली.

हा मेळावा केवळ दिवाळी निमित्त गाठीभेटींचा नव्हता, तर 'आपलं टॅलेंट आपल्या शहरासाठी वापरण्याची वेळ आली आहे' या विचाराच्या केंद्रस्थानी होता. सोलापूरमध्ये आयटी पार्क उभारण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

सोलापुरात आयटी पार्कसाठी आवश्यक जमीन निश्चित झाली असून, पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ आणि सरकारी सहकार्य मिळाल्यास, सोलापूर पुढील काही वर्षांत महाराष्ट्रातील प्रमुख आयटी केंद्र बनू शकते, असा विश्वास अनेक आयटी व्यावसायिकांनी व्यक्त केला.या परिषदेत विविध शहरांतील कंपन्यांत कार्यरत असलेल्या सीईओ, डायरेक्टर्स यांना सोलापुरात शाखा सुरू करण्यासाठी औपचारिक पत्रे देण्याचा निर्णय घेण्यात आला. सहभागी सदस्यांनी ठामपणे मागणी केली की, "जिथे काम करतो ती कंपनी सोलापुरात शाखा सुरू करावी." सोलापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये इंडस्ट्री कनेक्टिव्हिटी वाढवून विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, प्रकल्प आणि थेट इंडस्ट्री अनुभव देण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

सोलापूर आयटी असोसिएशनचे संस्थापक सचिव विजय जाधव म्हणाले, 'सोलापूरचं टॅलेंट जगभरात पसरलेलं आहे. आपलेच अभियंते सिंगापूर, दुबई, अमेरिका, बेंगळुरू, पुणे, हैद्राबादमध्ये मोठ्या जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. आता हेच टॅलेंट आपल्या शहराच्या विकासासाठी कामाला लावण्याची वेळ आली आहे.' कार्यक्रमात जामश्री रियालिटीचे अध्यक्ष राजेश दमाणी, सोलापूर आयटी असोसिएशनचे अध्यक्ष अपूर्व जाधव, उपाध्यक्ष माऊली झांबरे, सचिव विजय जाधव, सहसचिव अभिषेक जोशी, खजिनदार जयंत होले पाटील, संचालक नवनाथ तोरणे, विराज कुलकर्णी, धीरज करळे आदी मान्यवर उपस्थित होते.

**सोलापूर आयटीचे आजचे चित्र**

* सध्या सोलापुरात ७८ नोंदणीकृत आयटी कंपन्या कार्यरत
* एकूण १४९.५ कोटी रुपयांची सॉफ्टवेअर निर्यात उलाढाल
* शहरात वाढती आयटी मनुष्यबळाची क्षमता आणि प्रशिक्षित तरुणांची संख्या
* सोलापूरच्या सहा प्रमुख महाविद्यालयांमधून दरवर्षी सुमारे १,२०० आयटी पदवीधर बाहेर पडतात

# मंत्रालयातील टेंडर देण्याच्या आमिषाने २० लाखांची फसवणूक

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** मुंबई मंत्रालयात आपण अधिकारी असून स्टेशनरी विभागास अधिवेशन काळात लागणाऱ्या स्टेशनरीचे टेंडर मिळवून देतो. त्याचे बिल पास करुन फायदा मिळवून देतो, असे आमिष दाखवत एका तोतयाने शेंडगेवाडी (ता. पंढरपूर) येथील अभियंता तरूणाची तब्बल २० लाखांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातपुतेवाडी (शेंडगेवाडी) येथील अभियंता रघुनाथ बाळासाहेब माने (वय ३१) यांनी दिलेल्या फियार्दीवरुन प्रवीण तानाजी राडे (मूळ रा. आमनापूर ता.पलूज, जि. सांगली, सध्या रा.मलबार हिल, मुंबई) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. माने हे राजेवाडी येथील सद्गुरू श्री श्री साखर कारखान्यात अभियंता म्हणून कार्यरत आहेत. ३१ जानेवारी २०२५ रोजी त्यांचे काका तानाजी सातपुते (रा. शेंडगेवाडी) हे मंत्रालय, मुंबई येथे अधिकारी असल्याचे सांगणाऱ्या प्रवीण राडे याला त्यांची कार भाड्याने देण्यासाठी निघाले होते.त्यांच्यासोबत माने हेही मुंबईला गेले. त्याठिकाणी राडे याने त्यांना मलबार हिल येथील त्याच्या घरी नेले. आपण मंत्रालय येथे स्टेशनरी विभागाचे काम पाहत असून अधिवेशन काळात लागणाऱ्या स्टेशनरीचे टेंडर तुम्हाला मिळवून देतो. तसेच बिल काढून तुमचा फायदा करून देतो, असे त्याने सांगितले. त्यानंतर माने हे गावी आले. तेव्हापासून त्यांच्याशी राडे हा सातत्याने संपर्क साधून टेंडरसाठी २० लाख रूपयांची पूर्तता करण्याची मागणी करु लागला.८ जुलै २०२५ रोजी राडे हा माने यांच्या घरी आला. सोबतत्याने करार करण्यासाठी स्टँप, कोरा चेक दाखविल्याने माने यांनी त्याला रोख १२ लाख रुपए दिले. त्यानंतर उर्वरित ८ लाख रुपए बँकेतून आरटीजीएसद्वारे त्याला पाठविले.याबाबतचा लेखी करारही करण्यात आला. या घटनेनंतर माने हे राडे याला टेंडर आणि बिलाविषयी विचारण्यास संपर्क साधत होते. मात्र, वेगवेगळी कारणे सांगून तो टाळाटाळ करू लागला. अखेर याविषयी संशय आल्याने माने यांनी मुंबई मंत्रालयात जाऊन चौकशी केली असता राडे नावाचा कोणीही इसम नोकरीस नसून त्याने फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. तसेच त्याच्याविरूध्द सातारा व मुंबई येथेही फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याचे समजले, असे माने यांनी दिलेल्या फियार्दीत नमूद केले आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक वीरसेन पाटील हे करीत आहेत.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# किसन जाधव व नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नांना यश
## प्रभाग २२ मधील अतिवृष्टीग्रस्तांना मिळाली तात्काळ शासकीय मदत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात अलीकडेच झालेल्या अतिवृष्टीमुळे प्रभाग क्रमांक २२ मधील गैबी पीर नगर, धोंडीबा वस्ती, रामवाडी, इरण्णा वस्ती, यतिमखाना परिसर आदी भागांत मोठे नुकसान झाले. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे संसार उघड्यावर आले होते. या संकटातून सावरण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि नगरसेवक नागेश गायकवाड यांनी तत्काळ पाठपुरावा करत प्रशासनाची झोप उडवली आणि मदतीचा मार्ग मोकळा केला.या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळून, प्रशासनाने त्वरेने पंचनामे पूर्ण केले आणि नुकसानग्रस्त कुटुंबांच्या बँक खात्यांवर प्रत्येकी १०,०००/- ची थेट आर्थिक मदत जमा करण्यात आली आहे. ही मदत मिळाल्याने अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या यशस्वी मदतकार्याबाबत बोलताना किसन जाधव म्हणाले, प्रभाग २२ मधील नागरिक हे आमच्यासाठी कुटुंबाप्रमाणे आहेत. त्यांच्या अडचणींना प्राधान्य देत आम्ही कायमच तत्पर आहोत. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी आणण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे.नगरसेवक नागेश गायकवाड यांनी देखील या संकटकाळात तातडीने प्रतिसाद देत, संबंधित अधिकाऱ्यांशी सतत संपर्कात राहून मदतीचे काम मार्गी लावले. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, आमच्या तक्रारीची त्वरेने दखल घेत मदतीसाठी जे झटले, त्यामुळे वेळेवर मदत मिळाली, हे खरोखरच कौतुकास्पद आहे.या मदतकार्याबद्दल महायुती सरकारमधील कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पालकमंत्री जयकुमार गोरे, सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती यांचे खास आभार देखील यावेळी व्यक्त करण्यात आले.किसन जाधव यांनी शेवटी ठामपणे सांगितले की, 'प्रभाग २२ हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असून तो अधिक बळकट करण्यासाठी आम्ही उत्कृष्ट सेवा व सुविधा देण्यास कटिबद्ध आहोत.' असेही यावेळी जाधव म्हणाले.

# 'आर्द्रा मॉल' आर्द्रा म्हणजे शुद्धीकरणाच्या अखंड द्वैत्यवादी ऊर्जेचे आणि नवीन जीवनाच्या निर्मितीपूर्वीच्या आवश्यक विनाशाचे प्रतिबिंब - विजय अय्यर

ARDRA



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील नुकत्याच सुरू झालेल्या आर्द्रा मॉलला सोलापूरकरांनी प्रचंड प्रतिसाद दिला त्याचे उद्घाटन प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्री सनी लियोनी याच्या हस्ते संपन्न झाले होते. "आर्द्रा" या नावा संदर्भात सोलापूरकरांची उत्सुकता लक्षात घेता आम्ही हे सविस्तर विश्लेषण खास सोलापूरकरांना समजावे म्हणून देत असल्याचे आर्द्रा मॉल चे प्रमुख विजय अय्यर यांनी सांगितले.

सम्राट चौक, जुना कारंबा नाका, नॅशनल हायवे ब्रिजच्या पलीकडे सुरू झालेल्या आर्द्रा मॉलला अल्पवधीतच सोलापूरकरांनी अगदी आपल्या हृदयात स्थान दिले. आणि आमच्या आदरणीय ग्राहकांनी आर्द्रा संदर्भात उत्सुकते पोटी चौकशी सुरू केले की आर्द्रा नावाचे लौकिक काय ? म्हणून ही माहिती आम्ही देत आहोत असे त्यांनी सांगितले.

आर्द्रा हा शब्द संस्कृत मधून आलेला आहे. ज्याचे अनेक अर्थ आपल्या संस्कृतीत आहेत. प्रामुख्याने कोमल भावनेने परिपूर्ण, खगोलशास्त्र आणि ज्योतिषशास्त्रात आर्द्रा हे स्त्रीलिंगी रूप असून ओरियन या नक्षत्राशी संबंधित सहाव्या नक्षत्राचे महत्त्व धारण करते. आर्द्रा नक्षत्र हे भगवान शंकराचे यजमानपद व त्यांचे भयंकर रूप म्हणजे रुद्र आहे. या नावाची ऊर्जा वेदनाद्वारे परिवर्तनाकडे नेणाऱ्या विनाश आणि शुद्धीकरणाच्या अखंड द्वैतवादी ऊर्जेचे आणि नवीन जीवनाच्या निर्मितीपूर्वीच्या आवश्यक विनाशाचे प्रतिबिंबित करते. म्हणून आर्द्रा मॉलचा बनविलेला लोगो देखील आम्ही फॅशन आणि वैज्ञानिक पद्धतीने डिझाईन केलेला आहे. जेणेकरून तो कोणत्याही व्यक्तीचा विचार आणि भावना भावनांन सारखा दिसेल याची आम्ही काळजी घेतलेली आहे. आर्द्रा हे अश्रूंचे थेंब किंवा हिरा किंवा मानवी डोके दर्शविते जे भूतकाळातील दुःखांचे आणि मान्सूनच्या पावसाच्या आगमना सारखे अंतिम शुद्धीकरण दर्शविते म्हणून संस्कृतीत आद्रार्ला खूप महत्त्व आहे. याचे स्वरूप लक्षात घेऊन आम्ही आमच्या वन स्टॉप फॅमिली शोरूम ला आर्द्रा मॉल हे नाव दिलेले आहे. कुटुंबातील प्रत्येकासाठी प्रत्येक कुटुंबासाठी आर्द्रा मॉल वन स्टॉप फॅमिली शोरूम ला खरेदी करण्यासाठी एक वेळ अवश्य भेट द्या असे आवाहन आर्द्रा परिवार तर्फे करण्यात आले आहे.

# सांगोल्यात शुभदिपावली सुरमयी पहाटेत संगीत स्वरांचा दरवळ - रसिक मंत्रमुग्ध



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** दिपावलीच्या पहिल्या अभ्यंगस्नानाच्या मंगलप्रसंगी नरक चतुर्दशी. निमीत्त सोमवार दिनांक २० ऑक्टोबर रोजी पहाटे पाच वाजता महादेव गल्ली येथील श्री दत्त मंदिरात ह्लशुभदिपावली सुरमयी पहाटह्व या बहारदार संगीत मैफिलीने सांगोल्याची पहाट स्वरमयी केली. या कार्यक्रमाने शहरात भक्तीभाव, सुरांचा दरवळ आणि आनंदाचा माहोल निर्माण झाला. नव्या ओढीचा, नव्या गोडीचा भावगीत, भक्तीगीत, नाट्यगीत, गोंधळगीत अशा विविध संगीत प्रकारांनी सजलेल्या या मैफिलीत उपस्थित रसिक श्रोते सुरांच्या माधुर्यात रमून गेले.

गायक दयानंद बनकर (संगीत विशारद), अतुल उकळेसर यांनी आपल्या गोड आवाजात गीतांचे मनोहारी सादरीकरण केले. त्यांना पखवाजावर चैतन्य झाडे आणि तबल्यावर रणजीत सुतार यांनी उत्कृष्ट साथ दिली. निवेदन आणि सूत्रसंचालन सुधीर गायकवाड यांनी प्रभावीपणे केले.

या कार्यक्रमात डॉ. प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, कुमारी वैष्णवी बनकर, प्रसाद भाकरे, चंद्रकांत लिंगे, सचिन ढोले , भैरवनाथ गोडसे, गणेश भंडारे तसेच सर्व बाल कलावंत चमूनेही आपला सुरेल सहभाग नोंदवला. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक सोमेश यावलकर, नगरसेवक न.पा. सांगोला यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

कार्यक्रमानंतर श्री दत्त मंदिर समिती तर्फे सर्व कलाकारांचा सत्कार करण्यात आला. या वेळी प्रा. राजेंद्र ठोंबरे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत तो दरवर्षी नियमितपणे घेण्याची विनंती व्यक्त केली. कार्यक्रमाचे अनुमोदन व आभार प्रदर्शन ह.भ.प. सुभाष लवूळकर महाराज यांनी केले. रसिक श्रोत्यांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण दत्त मंदिर परिसरात स्वर, भक्ती आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या सुरमयी दिपावली पहाटेने सांगोल्याच्या सांस्कृतिक जीवनात एक अविस्मरणीय अध्याय कोरला गेला.

# वसुबारसच्या पावन पर्वावर गोमातेचे पूजन- व्यंकटेश चिलक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'गोसेवा हीच देशसेवा, गोसंवर्धन हीच राष्ट्रसेवा!' या भावनेतून सोलापूर येथील वेंकटेश्वर देवस्थानम मधील गोशाळेमध्ये गाय आणि वासरू चे वसुबारस निमित्त पूजन अत्यंत श्रद्धा व भक्तिभावाने करण्यात आले. पद्मशाली चौक येथील श्री वेंकटेश्वर देवस्थानम मध्ये ही पूजा मोठ्या भक्ती भावाने संपन्न करण्यात आली. पूजनानंतर गायींना नैवेद्य अर्पण, दीपदान करण्यात आले.

उपस्थित गोभक्तांचे मनःपूर्वक आभार मानले आणि गोसंवर्धनासाठी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले.

# देशावर संकट आलं की मोठे लोक माझं नाव घेतात'- पवार

**बारामती (कटूसत्य वृत्त):-** 'देशावर संकट आलं की मोठे मोठे लोक माझं नाव घेतात,' असं वक्तव्य करत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पुन्हा एकदा स्वतःच्या राजकीय योगदानाची आठवण करून दिली आहे. बारामती येथे तरुणांशी संवाद साधताना त्यांनी हे विधान केलं असून, सध्या ते मोठ्या चर्चेचा विषय ठरत आहे.

शरद पवार गेल्या चार दिवसांपासून बारामती दौऱ्यावर असून, सोमवारी त्यांच्या उपस्थितीत एक खाजगी कार्यक्रम पार पडला. यावेळी त्यांनी आपल्या कारकिदीर्तील प्रारंभिक अनुभव, बारामतीच्या विकासासाठी घेतलेले निर्णय आणि तरुणांना दिलेला संदेश याबाबत खुलेपणाने संवाद साधला. पवार म्हणाले, 'मी जेव्हा पहिल्यांदा राज्य सरकारमध्ये काम करण्याची संधी मिळाली, तेव्हा मी सर्वात पहिल्यांदा निर्णय घेतला की बारामतीत एमआयडीसी आणायची. दुधावर प्रक्रिया करणारी डायनामिक्ससारखी कंपनी इथे यावी यासाठी प्रयत्न केला.'

यासाठी त्यांनी रुई, सावळ, वंजारवाडी येथील शेतकऱ्यांची मदत घेतली. 'मी शेतकऱ्यांना विचारलं की जागा द्याल का, तर त्यांनी दोन्ही हात वर करून संमती दिली. यामुळे बारामतीकडे उद्योग केंद्र म्हणून पाहिलं जाऊ लागलं,' असं सांगत पवारांनी त्या काळातील सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

पुढे बोलताना पवार म्हणाले, 'मी विविध राज्यांत फिरतो तेव्हा अनेक तरुण-तरुणी सांगतात की त्यांनी बारामतीत शिक्षण घेतलंय. याचा अर्थ असा की, इथून मिळालेल्या शिक्षणाने त्यांचा पाया मजबूत झाला आहे. 'तरुणांना मार्गदर्शन करताना शरद पवार म्हणाले, ह्लचिकाटी सोडू नका, कष्ट करण्याची ताकद ठेवा. संकट आलं तरी चिंता करू नका. काम नीट करा, कष्टाने करा, आणि लोकांनी असं म्हणावं की काम द्यायचं असेल तर बारामतीच्या मुलांनाच द्यावं. हा विश्वास देशात निर्माण झाला पाहिजे.'

**राजकीय आणि सामाजिक संदेश**

शरद पवार यांच्या 'देशावर संकट आलं की माझं नाव घेतलं जात' या वक्तव्यावरून त्यांनी आपल्या दीर्घ कारकिर्दीत घेतलेल्या निर्णयांची, संकटसमयी घेतलेल्या भूमिका आणि राष्ट्रीय पातळीवरील विश्वासार्हतेची आठवण करून दिली. या विधानाने राजकीय वतुर्ळात आणि सोशल मीडियावरही चर्चेला उधाण आलं आहे.


# महसूल यंत्रणा सुट्टीच्या दिवशीही शेतकऱ्यांच्या मदतीसाठी कर्तव्यावर



**माढा (कटूसत्य वृत्त):-** अतिवृष्टी आणि महापुरामुळे बाधित झालेल्या माढा तालुक्यातील ९८ हजार ३३८ शेतकऱ्यांना नुकसान भरपाईनी रक्कम दिवाळीच्या सणात मिळावी यासाठी माढा तहसील कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी रविवारी सुट्टीच्या दिवशीही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या याद्या संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्याच्या कामाला लागल्याचे चित्र तहसील कार्यालयात पाहायला मिळाले. सप्टेंबरमध्ये ऑगस्ट,झालेली अतिवृष्टी आणि नंतर महापुराने सीना नदीकाठच्या परिसरात घातलेले वैमान यामुळे तालुक्यातील शेती आणि पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतकरी उद्ध्वस्त झाला. त्याला धीर देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीपूर्वी नुकसानग्रस्त नुकसानभरपाई दिली जाईल, असे आश्वासन दिले होते.त्यानुसार प्रत्येकी दोन हेक्टरप्रमाणे शेतकऱ्यांना तालुक्यातील ९८ हजार ३३८ बाधित शेतकऱ्यांच्या ८१ हजार ७३ हेक्टर क्षेत्रातील नुकसानीसाठी १३१ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. त्यांचे वितरण शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे. यासाठी पंचनाम्यानुसारच्या याद्या संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. प्रांताधिकारी जयश्री आव्हाड आणि तहसीलदार संजय भोसले हे रविवारी सुट्टीच्या दिवशी तहसील कार्यालयात ठाण मांडून होते.

महसूल अधिकारी, कर्मचारी यांनाही यासाठी उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले होते. रविवारी सकाळपासून सुमारे ३५ हजारांहून अधिक शेतकऱ्यांची नावे अपलोड करण्याचे काम पूर्ण झाले होते. रात्री उशिरापर्यंत हे काम चालू राहणार असल्याचे तहसीलदार भोसले यांनी सांगितले. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर मदतीची रक्कम जमा केली जाईल,असा शब्द मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला होता.

# कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आमदार या सभागृहासाठी जनतेतून निवडून दिले जातात २) श्वसनेंद्रिय ३) बारीक खडी, चक उलट लिहा ४) राशीचक्रातील एक रास ५) लहान डोंगर ६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे ७) एक अभिनेता-*** दामले ८) दारू (हिंदीत) ११) धरणग्रस्त आंदोलनाच्या नेत्या-** पाटकर १३) घर (हिंदीत) १४) स्त्रियांनी कपाळभर लावलेले कुंकू १५) उन्हाळ्यात पिले जाणारे एक दुग्धपेय १७) कोकणातील एक प्रख्यात तालुका १८) महानगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून जाणारा लोकप्रतिनिधी २२) दहा गुणिले नऊ २४) नशीब (हिंदीत) २५) हात, हस्त, टॅक्स (मराठीत) २७) कष्टाची सवय असणारा २८) फटाक्यांची माळ २९) वाळवलेली खजूर ३१) एक रास ३३) खोडकर (हिंदीत) ३५) दैत्य, राक्षस ३६) याच्यापासून ताक बनवितात ३८) रावणाची बहीण ३९) प्रश्न (हिंदीत) ४०) वेग ४१) स्त्रिया केसात बांधतात ती फुलांची माळ ४२) पक्ष्याचे पंख (हिंदीत) ४३) लोभ, स्वार्थ ४४) बंदूक (इंग्रजीत) ४६) दहा (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक ६) भारतातील एक राज्य ९) भीती, दरारा १०) स्पर्धेमध्ये विजेत्या संघास दिला जाणारा कप १२) मंद प्रकाश (इंग्रजीत) १४) स्वार्थ, हेतू १६) मनाची तृप्तावस्था, मुलाचे एक नाव १९) लहान बाळाच्या डोळ्यात घालतात ते २०) कपाळ २१) श्रीगणेशाचे एक नाव २३) तव उलट लिहा २६) एक म्हण-हाजीर तो *** २७) खर्चात केलेली बचत २९) एक म्हण-** तशी माती ३०) कोकण किंवा समुद्रालगतचे हवामान ३२) पतीचा भाऊ ३३) लग्नातील वधू मुलगी ३४) कसयुक्त, सत्व अर्क असलेली ३७) बेळगाव या राज्यात आहे ३८) धाडसी, पराक्रमी ३९) स्वाक्षरी ४०) बोलबाला, बोभाटा ४२) सूर्य उगवण्यापूर्वीचा उषःकाल ४४) गणेशोत्सवात आपण याची प्रतिष्ठापना करतो ४५) गतीने, वेगात ४७) वर उलट लिहा ४८) पगार (हिंदीत)

**सुडोकु - 84**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | | | | 6 | 9 |
| | | 3 | 2 | | | | 8 | 1 |
| | | | 6 | | | 4 | | |
| 1 | 5 | 7 | | | | 6 | 9 | |
| | | | | 7 | | 8 | | 2 |
| 2 | | 4 | | 1 | 6 | | | |
| 5 | | | | | 3 | 7 | 2 | 8 |
| 6 | | 2 | 8 | 9 | 4 | | 3 | |
| 8 | 3 | 1 | 5 | 2 | | | 4 | |

# सुवर्ण मिठाई अर्थात ‘स्वर्णिम मिठाई’ आणि तेही तिवाडी यांच्या अन्नपूर्णाची - नंदकिशोर तिवाडी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यंदाच्या वर्षी प्रथमच तिवडी यांच्या अन्नपूर्णा मिठाई नमकीन आणि बेकरीने सोलापूरकर एक विशेष पद्धतीने दिवाळी साजरी करावी म्हणून सुवर्ण मिठाई अर्थात स्वर्णिम मिठाईने सोलापूरकरांनी दिवाळीची सुरुवात करावी असे मत अन्नपूणार्चे प्रमुख व्यवस्थापक नंदकिशोर तिवाडी यांनी व्यक्त केली.

दिवाळी म्हणजे मिठाई असं संपूर्ण देशाचा समीकरण आहे परंतु यात सुवर्ण मिठाई हे जयपूर येथील त्योहार मिठाईने उच्चांक गाठला आहे तेथील चव आणि दर्जेदार मिठाई सोलापुरकरांना मिळावी म्हणून तिवाडी यांच्या अन्नपूर्णा मिठाई नमकीन बेकरीने स्वर्णी मिठाई सोलापूरच्या बाजारपेठेत आणली आहे.

स्वर्णिम मिठाई यात खास करून 18 हजार रुपये प्रति किलो मिठाई देणार असून गिफ्ट पॅक मध्ये मोठा आठ हजार रुपये आणि छोटा 2800 रुपये असे ऑप्शन अन्नपूर्णा मिठाई ने ग्राहका करिता उपलब्ध करून दिले आहे. तसेच स्वर्णीम मिठाई सामान्य ग्राहकांना देखील घेता



यावे म्हणून 400 रुपयाला एक नग देखील देण्याचा त्यांनी मानस व्यक्त केला आहे.

स्वर्णीम मिठाई गिफ्ट हॅम्पर दागिन्यांच्या ज्वेलरी बॉक्स प्रमाणे आकर्षक पॅक केलेले असल्यामुळे त्याची खासियत आणखीनच दिमाखदार होताना दिसत आहे. हि स्वर्णिम मिठाई गिफ्ट हॅम्पर तुम्ही अगदी जवळच्या व्यक्तीवर प्रभाव पाडण्यासाठी किंवा उच्च दर्जाचे मान्यवर किंवा तुम्हाला ज्यांच्यावर अत्यंत प्रेम आहे अशा सोन्या सारख्या व्यक्तींना देण्याकरिता स्वर्णिम मिठाई गिफ्ट हॅम्पर आमच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध असल्याचे तिवाडी यांनी सांगितले.

प्रत्यक्षात 85 हजार रुपये किलोचे सुवर्ण भस्म अफगाणिस्तानातील उच्च दर्जाचे कामरा बदाम, 4400 किलोचे मिस्टोरी पिस्ता साधारण 380 रुपयाचा वाडा यांच्यासह अतिउच्च दर्जाचे ड्रायफूट घटकापासून मिठाई बनवताना काश्मिरी के महीन केशर ने एक वेगळाच स्वाद या मिठाईच्या खाण्याने येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रत्यक्षात भारतातील सर्वात महाग मिठाई चा दर 1 लाख 14 हजार रुपयापर्यंत असून जयपूर येथील त्योहार मिठाईने याचा उच्चांक गाठले असल्याचे त्यांनी सांगितले.

ही जयपूर येथील मिठाई सुप्रसिद्ध असून आता सोलापूरकरांना महाराष्ट्रात उपलब्ध करून दिले आहे त्यामुळे सोलापूरकरांनी भरभरून प्रतिसाद द्यावा आणि या स्वर्णिम मिठाईचा लाभ घ्यावा असे आवाहन अन्नपूर्णा मिठाई नमकीन बेकरीचे प्रमुख तिवाडी परिवाराकडून करण्यात आलेले आहे.

# मोहोळ नगर परिषदेची येत्या काळातील पक्षीय रणनीती ठरवण्यासाठी पद्माकर आप्पा देशमुख यांनी बोलावली महत्वपूर्ण बैठक

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** गेल्या तीन दशकापासून मोहोळ शहराच्या विकासात्मक आणि राजकीय वाटचालीमध्ये उल्लेखनीय योगदान असलेले जेष्ठ मार्गदर्शक तथा यशस्वी उद्योजक पद्माकर अप्पा देशमुख यांच्या उपस्थितीत मोहोळ नगरपरिषदेच्या पुढील काळातील राजकीय रणनीती ठरवण्यासाठी मोहोळ येथे समविचारी पक्ष घटक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची महत्त्वपूर्ण बैठक बोलवण्यात आली आहे. या बैठकीत मोहोळ



नगर परिषदेच्या निवडणुकीतील विकासाभिमुख भूमिका त्याच बरोबर भविष्यातील लोकसंख्येत वाढ होणाऱ्या मोहोळ शहराच्या विकासाचा आराखडा याबाबत समन्वयात्मक चर्चा होणार आहे. त्यामुळे आज होणाऱ्या बैठकीकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

मोहोळ येथील ग्रामदैवत आणि राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सिद्ध नागेश यांचे निस्सीम भक्त असलेले पद्माकरआप्पा देशमुख यांनी श्री नागनाथ संप्रदायाच्या श्रद्धेतूनच श्री नागनाथ प्रासादिक तालीम या उपक्रमाच्या माध्यमातून सर्व भक्तांशी आपुलकीची नाळ कायम ठेवली आहे.

मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने पद्माकर आप्पा देशमुख यांची तळमळ असते.लोकसभा निवडणूक असो अथवा विधानसभा निवडणूक असो या कालावधी दरम्यान राजकीय रणनीती आणि मोहोळ शहरातील महत्त्वपूर्ण निर्णय प्रक्रियेमध्ये केंद्रस्थानी असलेले पद्माकरआप्पा देशमुख हे मोहोळ शहरातील पक्ष संघटनात्मक आणि राजकीय क्षेत्रातील अभ्यासू मार्गदर्शक म्हणून ओळखले जातात. त्यांनीच पंधरा वर्षांपूर्वी राष्ट्रवादीला निवडणुकीच्या निकालानंतरच्या सत्ता स्थापनेमध्ये चारीमुंड्या चित करत मोहोळ ग्रामपंचायतवर सरपंच पद खेचून घेत भगवा फडकवला होता.

या बैठकीत ज्येष्ठ नेते पद्माकर अप्पा देशमुख हे शहरातील पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना बहुमोल मार्गदर्शन करणार आहेत.

# 70 ते 80 वर्ष पूर्वीच्या वडाचे झाडाचे होणार पुनरोपण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जुळे सोलापूरला जोडणारा आसरा पुलाचे रुंदीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात सुरू असून रस्त्याच्या कडेला असलेली मोठी झाडे तोडण्यात आली आहे त्या ठिकाणी सुमारे 70 ते 80 वर्षापूवीर्चे जुने वडाचे झाड सुद्धा तोडण्यात येणार होते पण संभाजी ब्रिगेडचे श्याम कदम यांनी या वडाच्या झाडाचे पुनरोपण करण्यात यावे यासाठी संबंधित ठेकेदाराकडे ही मागणी लावून धरल्यामुळे या झाडाचे पुनरोपण आसरा येथील स्वामी समर्थ मंदिरासमोरील प्रांगणात करण्यात येणार असल्याची माहिती पी पी अँड ए कंट्रक्शन चे रोहण पाटील व वैभव जवळकोठे यांनी दिली आहे.


आसरा पूल रुंदीकरणासाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने विविध आंदोलन करण्यात आली होती याची दखल घेऊन आमदार सुभाष बापू देशमुख व केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी या आसरा पुलाच्या रुंदीकरणासाठी मोठा प्रमाणात निधी दिला होता.

या झाडाचे पुनरूपण करण्यासाठी सर्वप्रथम वडाच्या झाडाच्या फांद्या कट करण्यात आलेल्या आहेत वडाच्या झाडाभोवती दहा फूट खोल खड्डा खांदून त्याची मुळे सुटसुटीत करण्यात येणार असून त्यानंतर आसरा येथील स्वामी समर्थ मंदिराच्या समोर सुमारे वीस फूट खोल खड्डा खाणून विविध खते टाकून व माती टाकून त्याचे पुनरोपण करण्यात येणार आहे.

आसरा पुलाच्या रुंदीकरणाच्या विकासकामांसाठी आसराकडून जाणारे उजव्या साईडचे सुमारे दहा ते पंधरा मोठी झाडे तोडण्यात येऊन या ठिकाणी परत 100 नवीन झाडे लावण्यात येणार आहेत.



# गौडगावात आ. कल्याणशेट्टींच्या हस्ते विकासकामांचे भूमिपूजन



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर आवश्यक सोयी-सुविधांच्या उभारणीमुळे गावाच्या सर्वांगीण प्रगतीला नवा वेग मिळणार असल्याचे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. ते तालुक्यातील गौडगाव येथे विविध विकास कामाचा भूमिपूजन प्रसंगी बोलत होते.

ग्रामविकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या कामांमुळे स्थानिक नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक सक्षम आणि सुलभ होणार असल्याने गावाच्या सर्वांगीण विकासात भर पडणार आहे. गौडगाव तीर्थक्षेत्राच्या दृष्टीने आणखीन विकास कामे करणार असल्याचे सांगून ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबापर्यंत विकासाची गंगा पोहोचवणे, हीच खरी लोकसेवा असल्याचे मतही आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास शंकर पाटील, वीरभद्र सलगरे, श्रीशैल बनसोडे, श्रीकांत खानापुरे, सिद्धाराम म्हैत्रे, हाजीमलंग माने, इरसंगप्पा सलगरे, संजय पुजारी, योगेश हिरेमठ, निंगप्पा पुजारी, विजय पाटील, गिरमल गंगोंडा, मान्तेश पाटील, कल्याणी रावजी, महादेव चव्हाण, शिवशरण बमदे, रेवणसिद्ध कुंभार, उत्तम वाघमोडे, रमेश कुंभार, लक्ष्मीपुत्र कुंभार उपस्थित होते.

# 'एसव्हीसीएस'च्या तीन विद्यार्थ्यांची विभागीय कराटे स्पर्धेसाठी निवड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महानगरपालिका क्रीडा विभाग व जिल्हा कराटे असोसिएशन

यांच्यावतीने राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे घेण्यात आलेल्या कराटे स्पर्धेत एस. व्ही. सी. एस.हायस्कूल एमआयडीसी येथील लावण्या मेर, साईकृष्ण गुडूर व प्रणाली गुजर या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत सुवर्णपदक प्राप्त केले. त्यामुळे या विद्यार्थ्यांची पुणे येथे होणाऱ्या एस. व्ही. सी. एस. हाय देव कनिष्ठ महावि विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक हनुमंत येळमेली व आकाश बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक संगण्या म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक संतोषकुमार तारके यांनी अभिनंदन केले.

**विकणे /भाड्याने देणे आहे**

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

**संपर्क : डी. बी. शिंदे**

**मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३**

**पत्ता:** अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

